**संचालनालय,**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,**
**"भूजल भवन", शिवाजीनगर, कृषि महाविद्यालय परिसर,**
**वाकडेवाडी मार्ग, महाराष्ट्र राज्य पुणे ४११ ००५**
दुरध्वनी नंबर ०२०/२५५१३७१५-७१६-७१८ फॅक्स नं. २०-२५५३३१०८ ईमेल- admhq.gsda@gmail.com

संचा/प्रशा/आस्था-१/प्र.क्र.२५२/ १६८१ /२०१९, दिनांक - ३०/०५/२०१९

## कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठीची जाहिरात - २०१९

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत राज्य स्तरावरील अंमलबजावणी व संनियंत्रण कक्षासाठी संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयामध्ये खालील पदे कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. पद भरतीचे स्थान, पदांची संख्या खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र | पदनाम | एकूण पदे | किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता | किमान आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | Para Professionals (Data Entry Operator) (निम्न व्यावसायी (डेटा एन्ट्री ऑपरेटर)) | १ | H.S.C. (१२ th Std) Pass and Marathi Typing Speed ३०w.p.m. And English Typing Speed ४० w.p.m.<br>बारावी पास व मराठी टंकलेखन गति प्रतिमिनीट शब्द ३० आणि इंग्रजी टंकलेखन गति प्रतिमिनीट शब्द ४० परिक्षा उत्तीर्ण असेणे आवश्यक | १ वर्ष |

उपरोक्त पदांसाठी अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, दरमहा देय आर्थिक मोबदला व कामाचे स्वरुप, अटी व शर्ती निवड प्रक्रिया इत्यादिबाबतचा सविस्तर तपशील https://gsda.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर (मुख्यपान>प्रशासन> मानव संसाधन व व्यवस्थापन>भरती) उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

इच्छूक अर्हता प्राप्त पात्र उमेदवारांनी जाहिरातीचा व सूचनांचा, बारकाईने अभ्यास करुन आपला अर्ज सर्व कागदपत्राच्या पूर्ततेसह दिनांक १५/०६/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, वाकडेवारी रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ या पत्यावर पोष्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावा. विहित वेळेनंतर / तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही. अपूर्ण स्वरुपातील अर्ज व पात्रता धारण करीत नसलेले उमेदवार पदभरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
कौस्तुभ दिवेगांवकर (भा.प्र.से.)
संचालक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००५

दिनांक - ३०/०५/ २०१९

प्रत - नोटीसबोर्ड (मुख्यालय)

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा स्तरातील नेमणूकीसाठी अटी व शर्ती

- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा स्तरावरील सर्व पदांसाठी शेक्षणिक अर्हता, अनुभव वय, आर्थिक मोबदला, कामाचे स्वरुप, मानधन इत्यादी बाबीसाठी शासन निर्णय जस्वप्र-०११४/प्र.क्र.०६/पापु-११ दिनांक. ०७/०२/२०१४ व क्र. जस्वप्र-११४/ प्र.क्र.२८/ पापु-११, दिनांक १०/०२/२०१४ चे शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन करावे.
- कंत्राटी तत्वावर नेमलेल्या तज्ञ/कर्मचारी यांना या सेवेच्या आधारे शासनाच्या नियमित सेवेत सामावून घेतले जाणार नाही.
- कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करताना वयाची कमाल मर्यादा ५० वर्ष राहील. मात्र सेवानिवृत्त सरकारी /निम सरकारी अधिकारी/ कर्मचा-यांची कंत्राटी पदावर नियुक्ती करताना वयाची कमाल मर्यादा ६५ वर्ष राहील.
- प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन वैध ठरलेल्या अर्जदारांना कौशल्य चाचणी व प्रत्यक्ष मुलाखातीसाठी बोलविण्यात येईल वेळ, दिनांक निवडलेल्या उमेदवारांची यादी, निवड प्रक्रियेच्या सर्व सूचना https://gsda.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर देण्यात येईल. उमेदवारांना कोणत्याही सूचना थेट पत्रव्यवहार किंवा ई-मेल या अन्य माध्यमातून दिले जाणार नाही.
- प्रत्यक्ष चाचणी परिक्षा व मुलाखतीच्या वेळेस उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर मुळ कागदपत्र तसेच त्यांच्या साक्षांकित प्रतीसह विहित तारीख व वेळेस स्वखर्चाने उपस्थित राहावे. उमेदवार विहित तारीख व वेळेत उपस्थित न राहिल्यास शासन जबाबदार राहणार नाही.
- निम्न व्यावसायी (डेटा एन्ट्री ऑपरेटर) ही पदे भरताना कौशल्य चाचणी आणि मुलाखती घेण्यात येतील. कौशल्य चाचणी आणि मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणक्रमानुसार निवड करण्यात येईल.
- निवड प्रकीये संबंधीची सर्व माहिती शासनाच्या या संकेतस्थळावर https://gsda.maharshtra.gov.in उपलब्ध राहील. या प्रक्रियेमध्ये वेळोवेळी दिल्या जाणा-या सूचनांचे पालन करण्याची तसेच निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.
- निवड प्रक्रियेसाठी पात्र व अपात्र उमेदवाराची यादी शासनाच्या https://gsda.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.
- कंत्राटी पध्दतीने पद भरताना अर्हता प्राप्त उमेदवारांची टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी (मराठी व इंग्रजी) गुणाक्रमानुसार १:१० प्रमाणात उमेदवार निवडण्यात येतील. कौशल्य चाचणीमधून १:५ या प्रमाणात गुणक्रमानुसार उमेदवार निवडून त्यांच्य मुलाखती घेण्यात येतील. कौशल्य चाचणी ४० गुणांची परिक्षा घेण्यात येईल. चाचणी परिक्षेतील आणि मुलाखातीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणक्रमानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल.
- प्रतिनियुक्तीवरील कर्मचा-यांसाठी प्रकल्प भत्ता व इतर सुविधा शक्ती प्रदान समितीच्या मान्यतेनुसार देण्यात येतील.
- उमेदवारांना मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

- अर्ज संबंधित ठिकाणी विहित मुदतीत सादर करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. पोस्टाद्वारे अर्ज सादर करताना होणा-या विलंबास संबंधित विभाग जबाबदार राहणार नाही. विहित मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- **उमेदवारांनी लिफाफ्यांवर अर्ज केलेल्या पदाबाबत** :-
  "विशेष संनियंत्रण कक्ष भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ---------------- कंत्राटी पदासाठी अर्ज "असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
- कंत्राटी व प्रतिनियुक्ती वरील कर्मचा-यांना सेवामुक्त / मूळ विभागाकडे पाठविण्याचे अधिकार प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे राहतील.
- उमेदवाराला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

दिनांक – ३०/५/२०१९

# महाराष्ट्र शासन
# जलस्वराज्य-२ कार्यक्रम
# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
# डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासाठी अर्जाचा विहित नमुना

| कार्यालयीन उपयोगासाठी<br>अर्ज क्रमांक<br>अर्ज प्राप्त दिनांक | पासपोर्ट साईज<br>फोटो |
|---|---|

## वैयक्तिक माहिती

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव ------------------------------------------------
२) वडीलांचे / पतीचे नाव ------------------------------------------------
३) जन्मतारीख ------------------------------------------------
४) वय (०१-०३-२०१९ रोजीचे) ------------------------------------------------
५) कायमचा पत्ता ------------------------------------------------
------------------------------------------------
६) पत्र व्यवहाराचा पत्ता ------------------------------------------------
------------------------------------------------
७) संपर्क क्रमांक मोबाईल क्रमांक / दुरध्वनी क्रमांक

ई-मेल आयडी

८) लिंग (पुरुष/ स्त्री)
९) शैक्षणिक अर्हता

| शैक्षणिक पात्रता | मंडळ/ विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | विषय | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| एस.एस.सी | | | | |
| एच.एस.सी | | | | |
| ग्रॅज्युएट | | | | |
| पोस्ट ग्रॅज्युएट | | | | |

१०) इतर अर्हता :

अ) इंग्रजी टंकलेखनाची गती (कमीत कमी ४० श.प्र.मि.) ------------------------------- श.प्र.मि.

ब) मराठी टंकलेखनाची गती (कमीत कमी ३० श.प्र.मि.) ------------------------------- श.प्र.मि.

क) संगणकीय ज्ञान (एमएस-सीआयटी) ------------------------------

११) **अनुभव :**

| **अ.क्र.** | **काम केलेली संस्था/ कार्यालयाचा पत्ता** | **पदाचे नाव** | **कामाचा कालावधी** | | **वेतन रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| | | | **पासून** | **पर्यंत** | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी, असे प्रमाणित करतो/ करते की, आपले कार्यालयातील डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदाची जाहिरात काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच अर्जामध्ये दिलेली माहिती खरी असून, जर वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्या या पदासाठी उमेदवारी रदद् होईल याबदद्दल निवडसमिती / नियुक्त अधिकारी यांचा निर्णय मला बंधनकारक राहील.

आपला/ आपली विश्वासू,

ठिकाण -
दिनांक -

अर्जदाराची सही/-